**B.A. Part—III Semester–V Examination**

**COMPULSORY LANGUAGE**

**MARATHI**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

**सूचना :—** बहुपर्यायी प्रश्नांसाठी सुरुवातीला सोडविलेल्या प्रश्नांची उत्तरे मूल्यांकन करताना गृहित धरल्या जातील.

1. 'विचारांत तलवारीपेक्षा जास्त ताकद आहे' या विधानाची 'बुद्धि : माणसाची खरी शक्ती' या पाठाच्या आधारे चिकित्सा करा. 16

**किंवा**

शेतकऱ्यांचा दुरावस्थेची कोणकोणती कारणे महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा असूड' मधून व्यक्त केली आहेत? स्पष्ट करा.

2. 'आजच्या जगतात वृक्षपूजा-वृक्षोपासना अत्यंत आवश्यक झाली आहे' असे द.ता. भोसले का म्हणतात ? ते स्पष्ट करा. 16

**किंवा**

नैतिक मूल्यांच्या अध:पतनामुळे पश्चाताप करण्याची वेळयेते' या विधानाची 'दहा पैशांचा तमाशा' द्या पाठाच्या आधारे सत्यता पटवून द्या.

3. (अ) संत तुकारामांच्या संतवाणीतील संतांची विशुद्ध लक्षणे विशद करा. 8

**किंवा**

'जीवनाचा शोध घेताना' या कवितेच्या आधारे निसर्गाच्या उदार व निरपेक्ष वृत्तीवर प्रकाश टाका.

(ब) 'माणसातला माणूस मेला' असे सुखदेव ढाणके का म्हणतात ? ते 'खूणच पुसली मानवतेची' या कवितेच्या आधारे स्पष्ट करा. 8

**किंवा**

'दातासाठी हत्तीला मारण्याचे गणित .......... हे नवेगणित समजायला कार अवघड जाताहे ! असे लोकनाथ यशवंत का म्हणतात ? ते स्पष्ट करा.

4. (अ) अहवाल लेखन म्हणजे काय ? ते सांगून अहवाल लेखनाचे प्रकार स्पष्ट करा. 8

**किंवा**

नगर परिषद्, वाशीय परिसरात दोन गटांत मारामारीची घटना घडली. या घटनेसंदर्भातील चौकशी अहवाल लेखनाचा नमुना तयार करा.

(ब) दूरचित्रवाणी या प्रसार माध्यमासाठी लेखन करतांना कोणती खबरदारी ध्यावी लागते ? ते लिहा. 8

**किंवा**

'नवप्रसार माध्यमांसाठी लेखन कसे करावे ? त्यावर प्रकाशस्त्रोत टाका.

5. खालील बहुपर्यायी प्रश्न सोडवा :—

(1) 'शेतकऱ्याचा असूड' हा ग्रंथ इंग्लिश, संस्कृत व प्राकृत ग्रंथ व हल्लीचे अज्ञानी शुद्राहि अतिशूद्रांच्या ......... स्थितीवरून रचिला आहे :

(अ) श्रीमंतीच्या (ब) दीनवाण्या

(क) कामगारांच्या (ड) शेतकऱ्याच्या

(2) त्यांच्या 'पाठीमागे गुलहौशी मुले ज्यांस विधेची गोडीच नाही अशी, त्यांची थोड्याच काण्डात . ............ होऊन वडिलाचे नावाने पोटासाठी दोमदाम करीत फिरतात.

(अ) वाबू के भाई दरवेशी (ब) बहुरूपी

(क) भिकारी (ड) गोधळी

(3) ................ , कण्डीवाचून मनुष्य या जीवनकलहात जगूच शकता ना, कोल्हा - कुत्रादेखील त्याला भारी होता, फाडफाडून खाता.

(अ) यंत्रावाचून (ब) मंत्रावाचून

(क) पैशावाचून (ड) बुद्धीवाचून

(4) काशीस काही पुण्यकृते करावे या हेतूने नाना फडणविसांनी कोणत्या नहीवरे पूल बांधण्याचे काम चालू केले :

(अ) गंगा (ब) यमुना

(क) कर्मनाशा (ड) नर्मदा

(5) आज आपल्या देशाला ........... विचाराची गरज असल्याचे दादा धर्माधिकारी मानतात.

(अ) धर्मवादी (ब) समाजवादी

(क) गांधीवादी (ड) सत्यनिष्ठ

(6) आज आपण असे बधतो की, ज्याच्याजवळ ................ आहे तो लोकशाहीला विकत घेण्याचा प्रयत्न करीत आहे. असे दादा धर्माधिकारी म्हणतात.

(अ) बुद्धी (ब) विचार

(क) संपत्ती, धन (ड) स्वाभिमान

(7) आदिवासी जाती-जमाती आपले जे विवाह साजरे करतात .............. त्यामध्ये एक अनन्यसाधारण स्थान प्राप्त झालेले आढळून येते.

(अ) देवाला (ब) धर्माला

(क) स्त्रियांना (ड) वृक्षाला

(8) आदिवासीमध्ये मुलीचे लग्न आधी ................. करतात व मग तिचा विवाह नियोजित वराशी होतो.

(अ) देवाशी (ब) वृक्षांशी

(क) देवांच्या मुतीथी (ड) यापैकी नाही

(9) 'पाणी' या कथेचे लेखक कोण आहेत ?

(अ) भास्करचंदन शिव (ब) द.ता. भोंसले

(क) मुकुंद टाकसाळे (ड) वि.दा. सावरकर

(10) "हिरा खांदून आलाय, पर भरा कसं पाणी भरताय त्ये." हे उद्‌गार कोणाचे आहेत ?

(अ) भगावाणी (ब) सहा

(क) संता (ड) सभा

(11) "दामूइतका आडव्या टालक्याचा .............. माणूस उभ्याच काय, पण आडव्या महाराष्ट्रातसुद्धा आजवर कधी झाला नसेल."

(अ) तिरसट (ब) भोलसर

(क) तत्त्वनिष्ठ (ड) नियमनिष्ठ

(12) संत प्रवृत्तींची विशुद्ध लक्षणे कोणी सांगितली आहेत ?

(अ) संत नामदेव (ब) संत ज्ञानेश्वर

(क) संत तुकाराम (ड) समर्थ रामदास

(13) 'करूणाष्टके' खालीलपैकी कोणी लिहिले आहेत ?

(अ) संत नामदेव (ब) संत ज्ञानेश्वर

(क) संत तुकाराम (ड) समर्थ रामदास

(14) पायवाट पांढरी तयांतुनि आडवी तिडवी पडे ........... कुरणांमधुन चालली काळया डोहाकडे.

(अ) पिवळया (ब) निळया

(क) सोनेरी (ड) हिरव्या

(15) 'ग्रेस', यांचे पूर्ण नाव काय आहे ?

(अ) माणिक सीताराम गोडघाटे (ब) सीताराम माणिक गोडघाटे

(क) माणिक सीताराम घाटे (ड) सीताराम माणिक घाटे

(16) गुढी मोडली .............
रक्त मसांतील पडले काळे

(अ) मानवतेची (ब) समाजाची

(क) परंपरेची (ड) माणुसकीची 16×1=16

139 139 139 139 139